# समाजातील स्त्रियांना निर्भयपणे जगण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले: डॉ. जे. के. पवार



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करताना डॉ. जे.के.पवार समवेत शिवाजीराव पाटील,डॉ.विजयकुमार पाटील,डॉ.उषा पवार, डॉ.प्रा.पी.डी.माने,डॉ.संपदा पिसे, सुरेश पाटील व मान्यवर

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती चारशे वर्षांनंतरही का साजरी केली जाते तर त्यांचे काम जगामध्ये सर्वोच्च असे आहे.जगात अनेक राजे होते त्यांनी माणसांना गुलाम केले पण छत्रपती शिवाजी महाराजांनी गुलामाला माणूस म्हणून जगायला संधी दिली .तसेच आजच्या पिढीने समाजातील स्त्रियांचा आवमान होणार नाही याची काळजी घेणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन कोल्हापूर येथील शाहू अध्यासनाचे संस्थापक-अध्यक्ष व अर्थायनकार डॉ.जे.के.पवार यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ.जे.के.पवार बोलत होते. समाजातील स्त्रियांना निर्भयपणे जगण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. जे. के. पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज फक्त राजे नव्हते तर ते देवदूत होते. जिजाऊंनी त्यांच्यावर संस्कार केले. स्वराज्याची शपथ

घेतली व ती त्यांनी पूर्ण केली.छत्रपती शिवाजी महाराज उत्तम प्रशासकही होते.छत्रपती शिवाजी महाराज जन्मले नसते तर हे राज्य निर्माण झाले नसते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील चित्रफीत दाखवण्यात आली.

यावेळी कोतोली ते शेलारवाडी या मार्गावर मेगा पदयात्रा युवा मोहीम काढण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण, सहसमन्वयक डॉ. एस. एस. कुरलीकर, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, श्रीपतराव चौगुले विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संपदा पिसे, आय. टी. आय. प्राचार्य सुरेश पाटील होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. पी. डी. माने यांनी केले आभार डॉ. यु.एन.लाड यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. डी. एच. नाईक यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.